# शोध मराठीपणाचा .....

विद्या हर्डीकर, ल हाब्रा हाईट्स्, कॅलिफोर्निया

"अरे, हळू बोल.. या ट्रेन स्टेशनवर मराठीत कुणाचा बाप काढायची सोय नाही!"... हा संवाद न्यूजर्सीतल्या पहाटे सहाच्या कम्यूटर ट्रेनसाठी कुडकुडणाऱ्या घोळक्यातल्या दोघांचा. आज एकविसाव्या शतकात न्यू यॉर्कला जाणाऱ्या आगगाडीत चार मराठी माणसं दिसणं ही विशेष आश्चर्याची गोष्ट नाही. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी पुण्यातल्या आमच्या काही मित्रमंडळींची कल्पना होती, की 'अमेरिका हा एक चौक असून त्या चौकात मराठी लोक रोज एकमेकांशी गप्पा मारीत उभे असतात.' आज अमेरिकेची ही 'व्याख्या' गंभीरपणे घ्यायची वेळ आलेली आहे!

महाजाल (इंटरनेट), ई-टपालसेवा (ई-मेल), ई-गप्पा (चॅट), दूरध्वनी आणि विमान तिकीटे परवडण्याइतके खुळखुळणारे डॉलर्स यामुळे सॅन होजे (सिलिकॉन व्हॅली) तले 'आय. टी.' तरुण तुर्क न्यू यॉर्कच्या 'आय. टी.'वाल्यांशी चौकात गप्पा मारत असल्यासारखेच वाटतात! आमची 'म मराठीचा'वाली पिढी, आमच्या आईवडिलांची पिढी, आमच्या मुलांची 'एबीसीडी' पिढी, यांबरोबरच 'एच् वन' पिढी,, 'वाय टू के' पिढी असे अनेक प्रवाह आजच्या अमेरिका नावाच्या चौकात मराठी म्हणून नांदतात. सर्वच पिढ्या आपापल्या परीने पैशाने आणि कर्तृत्वाने यशस्वी; आणि महाराष्ट्राच्या मराठीपणाशी वेगवेगळ्या नात्यांनी बांधल्या गेलेल्या आमच्या पिढीला अमेरिकेत पाऊल ठेवल्यापासूनच 'माझ्या मराठीची वाट' मागे हरवू पहाते आहे असं वाटू लागलं. 'जन्मभूमीशी असलेली अदृश्य पण चिवट नाळ कापणं अशक्य आहे' हे देशांतर केल्यावरच उमगणारं चिरंतन सत्य आमच्या पिढीला जसं समजत गेलं, तसतसे मराठीपणाच्या शोधात अनेक उपक्रम आम्हाला करावेसे वाटले. त्यात मराठी मंडळे, अधिवेशने, मराठी नाटके, मराठी गीतांच्या ध्वनिमुद्रिका (म्हणजे रेकॉर्ड्स्, कॅसेट्स्, सी.डी. इ.), महाराष्ट्रासाठी निधिसंकलन करून यशस्वी केलेल्या 'खेडे दत्तक' योजनेसारखे उपक्रम, या सर्वांचा उल्लेख करावा लागेल.

मराठी म्हणून रुजताना मराठी भाषेचे अंकुर पालवणं हे स्वाभाविकच होतं. मुलांसाठी जागोजागी सुरू असलेले बालविहार ही त्याची पहिली निशाणी. त्यानंतर मुलांसाठी 'बोबडकांदा बडबडकांदा' किंवा 'मराठीचा श्रीगणेशा' (सुषमा येरवडेकर) अशी पुस्तके लिहिली गेली. कॉम्पॅक्ट डिस्कवर 'पंचतंत्रातल्या गोष्टी' (स्वाती नवरे), 'मायमराठी' (हेमांगी जोशी देवधर), 'परीची शाळा' (अनुराधा गानू), 'मराठी शिका' (आसावरी केळकर) अशी मराठी शिकवण्याची तंत्रे काहींनी सुरू केली.

डॉ. माधव देशपांडे आणि डॉ. अशोक अकलूजकर यांनी संगणकावर मराठी अक्षरमुद्रा (फॉण्ट) निर्माण केले ते 'विन्डोज' निर्माण होण्याच्याही आधी, म्हणजे आजच्या घरगुती संगणकाच्या (ज्याला आपण पर्सनल कम्प्युटर किंवा पी.सी. म्हणतो) दृष्टीने ते अश्मयुगच म्हणावं लागेल. त्यानंतर श्रीकृष्ण पाटील यांनी मराठीच नव्हे, तर सर्वच भारतीय लिपींसाठी आणि हिब्रू लिपीसाठीही अक्षरमुद्रा निर्माण करून नवी पाऊलवाटच निर्माण केली. आज महाराष्ट्रात विपुलपणे उपलब्ध असलेल्या अक्षरमुद्रांची गंगोत्री अमेरिकेतल्या मराठी समाजात आहे!

माझ्या सुदैवाने मी शिकत होते त्या अमेरिकेतल्या मिशिगन विद्यापीठाच्या ग्रंथालयात उदंड मराठी, हिंदी आणि बंगाली पुस्तकं होती. मराठी साहित्यातील ताज्या घडामोडी समजाव्यात म्हणून मी रविवारचा महाराष्ट्र टाईम्स विमानडाकेने मागवायला सुरुवात केली. पण हळूहळू माझ्या भोवतीचं जग बदलत असल्याचं जाणवू लागलं. एकीकडे म.टा. वाचताना जवळचं हरवू पाहणारं मुठीत सापडतंय असं वाटत होतं, तर दुसरीकडे म.टा.तल्या आणि पुस्तकातल्या त्या जगाकडे आपण काचेपलीकडून पहातो आहोत अशी काहीशी अस्वस्थताही वाटू लागली होती. पूर्वी वाचलेल्या प्रवासी लेखकांच्या लेखनाचा माझ्या अनुभवांशी संबंध नाही असं लक्षात येऊ लागलं. कुठल्यातरी फेलोशिपवर किंवा फिरायला तात्पुरते अमेरिकेत आलेल्या आणि परत गेल्यावर भराभर पुस्तकं लिहिणाऱ्या लेखकांच्या लेखनातील उथळपणा, ठोकून दिलेली गैरसमजयुक्त विधाने, भारतीय संस्कृतीवर वारेमाप स्तुतिसुमने उधळत केलेली अमेरिकन संस्कृतीची तुलना, क्वचित हेव्यानेही अमेरिकेतल्या मराठी माणसांची नालस्ती, हे लक्षात यायला लागलं. वर दिसणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाखालचे अनेक सूक्ष्मप्रवाह (अंडरकरंट्स्) या साहित्यात उमटण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनुभवांचा तेथे निश्चितच अभाव होता. त्यातूनच मराठी म्हणून महाराष्ट्राबाहेर आणि देशाबाहेरही राहण्याच्या वेदना आणि जल्लोष या दोन्हींचे अनुभव व्यक्त करण्याची गरज वाटू लागली. माझ्यासारखीच अमेरिकेतील अन्य मराठी लोकांना दोन गोष्टींची आवश्यकता कळत नकळत वाटत होती.

एक म्हणजे महाराष्ट्रातल्या मराठी साहित्यात 'अनिवासी' मराठी लेखकांच्या साहित्याचे पडसाद उमटणं आवश्यक होतं. दुसरं म्हणजे, अमेरिकेतील मराठी समाजात आपल्या अनुभवांच्या देवाणघेवाणीसाठी काही संवाद असण्याची आणि त्यासाठी काही व्यासपीठं असण्याची आवश्यकता.

अनुभवांची देवाणघेवाण आपल्या सांस्कृतिक संदर्भात होण्यासाठी मातृभाषेशिवाय पर्याय नसतो. या दोन्ही दिशांनी १९७४ ते १९७८ या काळात प्रयत्न सुरू झाले. 'कुंपणापलीकडले शेत' या कथासंग्रहाने मराठी साहित्यात पडसाद उमटवला; तर 'एकता' या कॅनडातून प्रसिद्ध झालेल्या त्रैमासिकाच्या उपक्रमाने मराठी लोकांना आपल्या अनुभवांच्या अभिव्यक्तीची दारं खुली केली. या दोन्ही प्रयोगांबद्दल थोडं तपशीलानं लिहायला हवं...

सुमारे १९७४ च्या सुमारास वॉशिंग्टन डी.सी. येथील श्री. दिलीप वि. चित्रे यांनी भारताबाहेर वास्तव्य असणाऱ्या मराठी लोकांच्या कथांचा संग्रह प्रसिद्ध करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. सुमारे पंचेचाळीस कथा निवडून श्री. चित्रे यांनी मौजचे श्री. श्री.पु.भागवत यांना पाठवल्या. त्यातून कसोटीला उतरलेल्या सुमारे एकवीस कथांचा संग्रह 'कुंपणापलीकडले शेत' हा मराठी साहित्यात उमटलेला अमेरिकन मराठी जीवनाचा पहिला पडसाद. यातील फारच थोड्या लेखकांच्या कथा पूर्वी प्रसिद्ध झालेल्या होत्या. बरेच लेखक हे त्या अर्थाने नवखे होते. पण त्यांच्या कथा या स्वानुभव आणि कल्पना यांच्या संमिश्र रसायनातून प्रकटलेल्या आणि म्हणून

एक प्रकारचा ताजेपणाचा आस्वाद देणाऱ्या होत्या. अमेरिकन जीवनातला वेग आणि धावपळ, बारीकसारीक बाबतीतही आधार वाटावा अशा गोतावळ्याचा अभाव आणि त्यामुळे येणारा मानसिक थकवा, एकटेपणाची जाणीव, परक्या देशात धीरानं निभावून नेण्याची धावपळ, धडपड आणि त्याच्या सततच्या ताणाचे ओझे याची प्रतिबिंबं या कथांतून आहेत. अमेरिकन संस्कृतीतील व्यक्तिस्वातंत्र्य, स्वावलंबन, स्वकेंद्रिततेमुळे येणारी काहीशी अरेरावीची वृत्ती, ज्याला 'किलिंग स्पिरिट' म्हणतात तशी ईर्षात्मक स्पर्धाळू वृत्ती, यांची संवय व्हायला वेळ लागतो. त्याचे अनुभव काही कथांतून आहेत. लैंगिक स्वातंत्र्य, आणि त्यातून अपरिहार्यपणे दिसणारे परिणाम, उध्वस्त कुटुंबे, यांच्या वातावरणात मुले वाढवताना वेढणारी काळजी कथांतून येणे अपरिहार्य होतं.

त्या काळातील अमेरिकेतील अस्थिरता आणि त्यामुळे 'परक्या' देशात रहाताना वाटणारी सुरक्षितता कथांतून दिसते. तसा 'बालपणीचा काळ सुखाचा' असा वाटणारा सुखद उमाळा आणि आपण आलो त्या वाटेने आता पुन्हा परतणे शक्य नाही ही वास्तवाची टोचणी यांचेही भावनिक आवर्त या कथांतून आलेले आहेत.

१९७८ मधे कॅनडातील श्री. विनायक गोखले व श्री. अशोक पांगारकर यांच्या प्रयत्नांतून 'एकता' हे त्रैमासिक सुरू झाले. मराठी अक्षरमुद्रा व संगणक असण्यापूर्वीचा तो काळ लक्षात घेता हे त्रैमासिक चालवणे किती जिकीरीचे होते हे लक्षात येईल. संपूर्ण अंक हाताने लिहून मग छपाईस द्यावा लागे. किरकोळ वर्गणीत वाचकांना अंक देता यावा यासाठी आपला भरपूर वेळ घालवून आणि आपापले उद्योग सांभाळून अंकाचे काम करावे लागे. गेली सत्तावीस वर्षे हे त्रैमासिक चालू आहे आणि दिवसेंदिवस त्याचे अंतरंग आणि बाह्यस्वरूप अधिकाधिक दर्जेदार होत आहे. उदार व मोकळ्या संपादकीय धोरणांमुळे 'एकता'चे स्वरूप व्यापक होण्यास मदत झाली. वाचकांच्या कल्पना व सूचना वेळोवेळी लक्षात घेऊन योग्य दिशेने त्यात बदलही केले गेले. बदलत्या तांत्रिक सुविधांचा उपयोग करून घेतल्यामुळे आता 'एकता'चा अंक सुबक अक्षरमुद्रा वापरून देखण्या स्वरूपात येतो. नवोदित लेखकांना उत्तेजन देण्यासाठी 'एकता'ने कथास्पर्धा आयोजित केल्या. विविध राज्यातल्या लोकांना अंकाच्या निर्मितीत सहभागी करून घेण्यासाठी अकरा विशेषांक काढले. आठ लेखकांनी लिहिलेली साखळी कादंबरी प्रसिद्ध केली. समस्यापूर्ति आणि शब्दकोड्यांसारखी सदरे चालवली. 'गाठभेट'सारख्या सदरांमुळे अनेक जुन्या मित्रांना एकमेकांचा पत्ता लागला. 'एकता'ने अनेक लेखकांना लेखनाची स्फूर्ती दिली. आपल्या अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी 'एकता'ने एक भक्कम व्यासपीठ अमेरिकेतील मराठी माणसांना दिले यात शंकाच नाही. मी महाराष्ट्रातील रचनात्मक कार्याच्या दिशांची ओळख करून देणारे सदर 'एकता'त जवळ जवळ वीस वर्षे लिहिले. मला सापडलेला ठेवा अमेरिकेतील मराठी लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आनंद तर होताच, पण महाराष्ट्रातील संस्था आणि माणसांशी माझा संवाद सुरू झाला आणि माझे 'हरवलेसे' वाटणारे जग परत सापडल्याचा आनंदही मला मिळाला.

उत्तर अमेरिकेतील मराठी मंडळींच्या सांस्कृतिक व साहित्यिक चळवळीचे 'एकता' हे मुखपत्र आहे, हे मान्य करूनही मराठी समाजाला संघटित करून त्यात एक सामाजिक सुसंवाद निर्माण करण्यासाठी एका मुखपत्राची आवश्यकता मला आणि अन्य काही मराठी माणसांना वाटत होती. 'एकता'च्या स्वरूपाला धक्का न लावता आणि 'एकता'शी कोणत्याच बाबतीत स्पर्धा न करता वृत्तपत्रीय स्वरूपाचे मुखपत्र 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' सुरू झाले १९८१ च्या सुमारास. हे शिकागोहून जयश्री हुपरीकर संपादित करीत. कै. श्री. विष्णु वैद्य व कै. श्री. शरद गोडबोले त्यांना मदत करीत.

१९८६ ते '९१ अशी सहा वर्षे महिन्यातून एकदा प्रसिद्ध होणाऱ्या वृत्ताचे संपादन मी केले. श्री. मोहन व सौ. समिता रानडे हे माझे वृत्तातले सहप्रवासी. वृत्ताच्या मूळ स्वरूपात आम्ही काही आमूलाग्र बदल केले आणि ते वाचनीय करून आम्ही वर्गणीदारांची संख्या पाचपटीने वाढवली. अमेरिकेत मराठी वृत्तपत्रीय स्वरूपाचे मासिक चालवणे हा एक वेगळा आणि महत्त्वाचा प्रयोग आहे. त्यामुळे माझ्यातल्या पत्रकाराला ते आव्हानच होते. त्यावेळी सुचलेले नवे विचार, लिहिलेली संपादकीये, वाचकांचा प्रतिसाद, मिळालेले नवे साहित्यिक मित्र, या सर्वांतून नवनिर्मितीचा आनंद मिळाला हे नक्की. 'एकता'सारखाच वृत्ताचा एक परिवार निर्माण झाला. अनिवासी मराठी माणसांच्या जिव्हाळ्याच्या, महाराष्ट्रात घडणाऱ्या घडामोडी, अमेरिकेतल्या मराठी समजातल्या घटना, नव्या मराठी पुस्तकांचा परिचय, विविध क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या अमेरिकेतील मराठी व्यक्तींचा परिचय, शैक्षणिक व अन्य क्षेत्रात विशेष कर्तृत्वाने झळकणाऱ्या मराठी अमेरिकन नवयुवकांचा परिचय अशी विविध सदरे आम्ही सुरू केली. नोकरी आणि करिअर करणाऱ्या मराठी महिलांच्या मुलाखतीवर आधारित लेखमाला मी आणि अजिता काळे यांनी मिळून लिहिली. ज्याला पत्रकार साहित्य म्हणता येईल अशा मराठी साहित्यात बृहन्महाराष्ट्रवृत्ताने एक वेगळी भर निश्चितच घातली आहे. म्हणूनच आज महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची संगणकीय आवृत्ती महाजालावर उपलब्ध असतांनाही वृत्ताची २५ व्या वर्षातली वाटचाल यशस्वीपणे चालू आहे.

'कुंपणापलीकडले शेत'चा प्रयोग, 'एकता' आणि 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' हे २५ वर्षांपूर्वी अमेरिकेत लावलेले मराठीचे वेल! ललित लेखन आणि पत्रकारिकतेचे लेखन या दोन्ही अंगांनी मराठीचा वेल गेल्या पंचवीस वर्षांत वेगवेगळ्या दिशांनी डंवरला आहे. महाराष्ट्रातील मराठी साहित्यात आणि अमेरिकेतील इंग्रजी व मराठी अशा दोन्ही साहित्यात याची रसरशीत पालवी दिसते! साहित्य आणि साहित्यिक या दोन्हीची समृद्धता जाणवते.

मराठी अधिवेशनानिमित्त प्रसिद्ध होणारे अंक, विविध मराठी मंडळांचे दिवाळी अंक, महाराष्ट्रातील वृत्तपत्रांच्या महाजालावरील आवृत्त्या अशी माध्यमेही आता मराठी माणसांच्या अभिव्यक्तीसाठी उपलब्ध आहेत. या माध्यमांतून लिहिताना आत्मविश्वास आलेले काही आणि भारतात असल्यापासून लिहिणारे काही असे साहित्यिक आज महाराष्ट्रातील नियतकालिकांतून लिहितात.

ललित लेखनाच्या क्षेत्रात डोकावले तर कै. अशोक काळे, कै. अजिता काळे, शोभा चित्रे, विद्युल्लेखा अकलूजकर, संध्या कर्णिक, विद्या हर्डीकर, ललिता गंडभीर, उषादेवी कोल्हटकर, अशा

काही लेखकांचे लेखन महाराष्ट्रातील नियतकालिकांत दिसते. यातील काही नावे 'मौजे'सारख्या मराठी साहित्यातील मातब्बर म्हणून समजल्या जाणाऱ्या नियतकालिकात झळकतात !

पत्रकार म्हणून लिहिणाऱ्यात श्री. दिलीप चित्रे (केसरीत स्तंभलेखन), श्री. रमेश गुणे (लोकसत्ता), व कै. श्री. यशवंत कानिटकर ही नावे डोळ्यासमोर येतात. अनुराधा गानू (मोरपिसे - लोकसत्ता) आणि अनंत लाभसेटवार (अमृत) यांनीही वर्षभर असे स्तंभलेखन केले.

काही पत्रकारांची व लेखकांची नावे अमेरिकेतील अमराठी नियतकालिकांत दिसतात. श्री. रमेश गुणे हे 'इंडिया अब्रॉड'मधे तर अर्चना डोंगरे 'इंडिया वेस्ट' आणि हवाईतून प्रसिद्ध होणाऱ्या 'हिंदुइझम टुडे'मधे लिहितात. त्यांच्या लेखनाची स्पंदने मराठी साहित्यात कमी वेळा जाणवली, तरी ते मराठीतही तेवढ्याच ताकदीने लिहितात. मुख्य म्हणजे मराठी साहित्य जगाबाहेर पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. मराठी साहित्य मराठी जगाच्या बाहेर पोहोचवण्याच्या कामात अजिता काळे, ललिता गंडभीर आणि पुष्पा आगाशे (इंग्रजी कविता), साधना नेऊरगावकर (लॉस एन्जलिस टाईम्स) अशा अमेरिकेतील आणखी काही मराठी व्यक्तींचाही वाटा आहे.

मराठी नियतकालिकांच्या पुढची पायरी म्हणजे मराठी पुस्तके!

'एकता' व 'वृत्तात' लिहिणाऱ्या आणि न लिहिणाऱ्या काही लेखकांची पुस्तके गेल्या पंधरा वर्षात प्रसिद्ध झाली आहेत. लेखसंग्रह, कथासंग्रह, कवितासंग्रह, नाटक, प्रवासवर्णन, कादंबरी असे विविध प्रकार त्यात पहायला मिळतात. सर्वात जास्त मराठी पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत डॉ. अनंत लाभसेटवार यांची. कथा, कादंबरी आणि लेख या तिन्ही प्रकारांचा समावेश त्यात आहे. त्यांची दहाचे वर पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

आणखी काही उदाहरणादाखल सांगायची म्हटली तर.. विद्युल्लेखा अकलूजकर यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. यात 'मेपलची पाने' आणि 'मेरा जूता है जापानी' ही स्तंभलेखनाच्या वळणाच्या खुसखुशीत लेखांची पुस्तके तर 'यथा काष्ठंच काष्ठंच...' हा दीर्घ आणि गंभीर वळणाच्या लेखांचा संग्रह आहे. कोणत्याही वळणात गेलं तरी हे लेखन वाचकाला अंतर्मुख करतं.

ललिता गंडभीर यांची चार पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत. 'पश्चिमगंध' आणि 'पक्षी जाय देशांतरा' या कथासंग्रहात एका भारतीयाच्या दृष्टीकोनातून रोज भेटणाऱ्या अमेरिकन माणसांची सुखदुःखं आहेत. 'पशुप्रेमियांच्या दुनियेत' या कथासंग्रहात अवतीभोवतीच्या आणि मुलांच्या प्राणी आणि पक्षी पाळण्याच्या वेडावर मिश्किल भाष्ये आहेत. 'तारेवरची कसरत' या पुस्तकात जुनी अंगवळणी पडलेली भारतीय मूल्ये आणि नव्या परदेशी स्थिरावताना होणारी तारांबळ आणि करावी लागणारी तारेवरची कसरत आहे. 'दहशतवादाची कथा' ही त्यांची कादंबरी २००३ मधे प्रसिद्ध झाली आहे. मराठी साहित्यातील विषयांना जागतिक पातळीच्या संदर्भावर नेण्याचे काम या कादंबरीने केले आहे.

शोभा चित्रे यांची तीन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'गोठलेल्या वाटा' जुन्या आलो त्या वाटा तर गोठल्या. आता त्या वाटेने पुन्हा परतता येणार नाही ही हुरहूर आहे. 'गौरी गौरी कुठे आलीस' असं विचारत ती जुन्या आठवणींचा मागोवा घेत घेत आजला सामोरी जाते आहे... इथे आलेल्या प्रत्येकालाच 'यू केम अ लाँग वे बेबी'चा साक्षात्कार होत असतो. त्या अनुभवात हृद्यता, अनामिक हुरहूर, एक विजीगिषु समाधान असे अनेक संमिश्र भाव असतात. 'पानगळींच्या आठवणी'त स्मृतिभ्रंश झालेल्या आपल्या सासऱ्यांचा आजाराशी सामना आणि सर्व कुटुंबियांचा त्यांच्या आजाराबरोबर झालेला वेदनामय मानसिक प्रवास आहे. अशा प्रकारचं, वेगळ्या विषयावरचं चित्रण मराठी साहित्यात विरळाच असावं.

अशाच प्रकारचं, मूत्रपिंडाच्या आजाराशी विलक्षण धैर्याने सामना करण्याच्या स्वतःच्या अनुभवाचं निवेदन कै. यशवंत कानिटकर यांच्या 'येईल तो दिन..' या पुस्तकात आहे.

मध्यपूर्वेत अमेरिकन राखीव सैन्यादलाबरोबर सर्जन म्हणून गेलेल्या श्री. गंगाधर मद्दीवार यांचे स्वानुभवांचे निवेदन करणारं पुस्तक असंच वेगळं आणि वाचनीय आहे.

श्री. अजित कुकडे यांनी कॅनडात ड्रायव्हिंग स्कूल चालवणे हा मराठी माणसाच्या व्यावसायिक कल्पनेच्या जगाच्या काहीसा पलीकडचा व्यवसाय करताना आलेले अनुभव व इतर लेख आणि कविता काहीशा विनोदी शैलीत त्यांच्या 'सी. एन. टॉवरवरून' या पुस्तकात चित्रित केले आहेत.

डॉ. श्रीनिवास ठाणेदार यांचं 'ही श्रींची इच्छा' हे प्रांजळ आत्मचरित्रही उल्लेखनीय आहे.

कै. अजिता काळे हिची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. 'दूर देशींच्या गोष्टी' आणि 'गोष्टी देशांतरीच्या सांगेन...' अमेरिकेतल्या एका छोट्याशा खेड्यात 'प्लॅण्ड पेरंटहुड' हे विशेषतः पौगंडावस्थेतल्या म्हणजे टीन एजर मुलामुलींसाठी असलेले कुटुंब कल्याण केंद्र चालवताना आलेले अनुभव कथारूपात चित्रित केले आहेत.

असेच आपल्या वेगळ्याच व्यावसायिक जीवनातील अनुभव कै. लता देशपांडे यांच्या 'अनिकेत' पुस्तकातही दिसतात. त्यांचे आत्मचरित्र आणि हृदयरोग्यांसाठी त्यांनी लिहिलेले पाककृतीचे पुस्तकही विचार करायला लावणारे.

कै. अशोक काळे यांच्या 'घडलेली कथा' या संग्रहात बहुतेक कथा भारतात घडणाऱ्या प्रसंगांवर आहेत. तर जयश्री थत्ते-भट यांच्या 'मावळतीची झाडे' या कथासंग्रहात उगवतीच्या मनाने अनुभवलेले मावळतीच्या मनाचे रंग दिसतात.

संध्या कर्णिक यांच्या 'दिवा कुणाचा तेवत राही' या ललित लेखसंग्रहाचं स्वरूप काहीसं स्तंभलेखनासारखं आहे. अमेरिकेतल्या कोणत्याही मराठी चौकोनी कुटुंबात येणारे हे रोजचे चुटपुटीत अनुभव चुरचुरीत शैलीत मांडलेले. त्यांचं आणखी एक पुस्तक प्रसिद्ध झालं आहे.

'हास्यरेखा' या श्री. प्रकाश लोथे यांच्या पुस्तकात असेच चुरचुरीत अनुभव सापडतील. त्यांचंही 'ऊन पाऊस' हे नवं पुस्तक यंदा प्रसिद्ध झालं. खमंग खुशखुशीत भाषेत जीवनावर केलेली भाष्यं बघता बघता वाचकाला अंतर्मुख करतात श्री. आनंद गर्दे त्यांच्या 'अमेरिकन गुदगुल्या' या पुस्तकात. या पुस्तकाला नुकताच पुरस्कार मिळाला आहे.

विसकॉन्सिन राज्यात वैद्यकीय व्यवसाय करताना आलेल्या अनुभवांवर श्री. विजय सबनीस यांचं 'मिसिसिपी' हे पुस्तक २००१ मधे प्रसिद्ध झालं.

'अमेरिकेच्या अंगणात' हे नीलिमा कुलकर्णी यांचं पुस्तक या वर्षी प्रसिद्ध झालं आहे. सुधीर कुलकर्णी, सुधीर आंबेकर, अनुराधा गानू अशा आणखी काही लोकांची ललित निबंधाची पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत.

कवितांच्या क्षेत्रात, दिलीप वि.चित्रे, कुंदा जोशी, श्रीनिवास माटे, भूषण केळकर व शशिकांत पानट यांचे कवितासंग्रह बाहेर पडले आहेत. 'कॅपिटल पनिशमेंट' या प्रभाकर देवधर यांच्या कवितासंग्रहाचा अनुवाद अनुराधा गानू यांनी केला आहे. सुषमा येरवडेकर यांनी एक काव्यसंग्रह संपादित केला. असाच 'निवडक तीन' हा संपादित कवितासंग्रह २००५ साली प्रसिद्ध झाला.

१९८७ च्या सुमारास प्रसिद्ध झालेलं श्री. दिलीप चित्रे यांचं 'अलिबाबाची गुहा' आणि त्यानंतर जवळ जवळ चौदा वर्षांनी आता २००१ मधे प्रसिद्ध झालेलं अनुराधा गानू यांचं 'हरवले ते गवसले का' ही दोन नाटके.... 'आलो तर खरे या अलिबाबाच्या गुहेत, पण तिळा उघडचा मंत्र सापडला का? अमेरिकेत येऊन काय सापडलं काय हरवलं? अशी चाचपणी करणारी आहेत. प्रकाश लोथे यांचं 'वाटचाल' हे नाटक २००४ मधे प्रसिद्ध झालं. ही झाली अमेरिकेत आलेल्या पहिल्या पिढीची साहित्यातली स्पंदनं !

अमेरिकेत आलेल्या आमच्या आईवडिलांच्या पिढीचं प्रतिनिधित्व करणाऱ्या उषा गडकरी यांचं आपल्या अनुभवांचं पुस्तक प्रसिद्ध आहे. तर अमेरिकेत बऱ्याच मध्यम वयात येऊन आपलं बस्तान बसवून मुलांना वाढवण्याची वेगळी धडपड करणाऱ्या पिढीच्या प्रतिनिधी शालिनी सराफ यांच्या 'स्वप्नदेशीच्या गुजगोष्टी' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे.

उषा हरदास यांची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. माई घाग यांनी पाककृतीचं पुस्तक प्रसिद्ध केलं आहे.

'कुंपणापलीकडले शेत'नंतर जवळजवळ सोळा वर्षांनी अमेरिकेतल्या बारा लेखकांच्या कथांचा 'निरंतर' हा कथासंग्रह २००१ मधे प्रसिद्ध झाला. याचं संपादन विद्या हर्डीकर आणि संध्या कर्णिक यांनी संयुक्तपणे केलं आहे.

विज्ञानातल्या एका प्रयोगात दोन प्रतिमांतलं अंतर मिटवण्याची एक क्रिया असते. त्यासाठी त्या प्रतिमांकडे एका विशिष्ट कोनातून पहावं लागतं. तसं आम्ही इथे जगताना इथे घडणारी घटना आणि आमच्या भारतीय संस्कृतीत वाढलेल्या मनावर उमटणारी तिची प्रतिमा या दोहोंकडे एकाच वेळी पहाण्याचा प्रयत्न करत असतो. संगणकाच्या भाषेत सांगायचं तर मनाच्या दुभागलेल्या पटलावर (स्प्लिट स्क्रीनवर एकाच वेळी पेनिसिल्व्हेनिया आणि दार्जिलिंगची दृश्यं उमटत असतात. त्यातून कधी द्विधा मनःस्थिती होते. कधी वैफल्य येतं. कधी

एक पाय तळ्यात। एक पाय मळ्यात।<br>
एक जुन्या आठवाचा। हात हट्टानं गळ्यात॥

अशी मनःस्थिती होते, तर कधी त्याच अनुभवाला अचानक दुसरी मिती प्राप्त होते आणि द्विमिती चित्र पाहिल्याचा साक्षात्कारी आनंद होतो. त्या आनंदात मग सगळीच अंतरं मिटून जातात. उरतात ते मूलभूत मानवी भावनांचे, संघर्षाचे, विचारांचे आवेग आणि आलेख!

शरीरानं हजारो मैल दूर राहिलो तरी हे अंतर आम्ही मनानं मिटवत असतो. म्हणून ही धडपड तशी निरंतर आहे. हा प्रवास निरंतरचा प्रवास आहे. या प्रवासाची चित्रणं या संग्रहात आहेत.

जुलै २००१ मधे 'एकता'तील तीस कथांचा संग्रह 'विदेशिनी' प्रसिद्ध झाला. त्याचं संपादन विद्युल्लेखा अकलूजकर यांनी केलं. त्यानंतर पंधरा लेखकांनी लिहिलेल्या लेखांचा 'ल्याले ऐलपैल' हा लेखसंग्रह एप्रिल २००३ मधे प्रसिद्ध झाला. त्याचं संपादन विद्या हर्डीकर आणि अनुराधा धुपकर यांनी केलं आहे.

तात्पर्य, गेल्या दोन दशकात चाळीसएक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकी तीन चार पुस्तकांना महराष्ट्र राज्य पातळीवरचे पुरस्कारही मिळाले आहेत.

मराठी वाङमयाच्या मुख्य धारेत सामावून जाण्याचं सामर्थ्य आणि गुणवत्ता यापैकी बऱ्याच साहित्यकृतीत आहे. कदाचित हे साहित्य तथाकथित समीक्षकांच्या जाड चष्म्यात न मावणारं, काहीसं मुक्त छंदातलं असेल. पण त्यातल्या संवेदनांना सच्चेपणाचा ताजा गंध आहे. अमेरिकेतील संघर्षांना सामोरं जाताना येणाऱ्या अनुभवांचा वेगळेपणा वाचकांना जाणवेल. तरीही त्या अनुभवातील सार्वत्रिकता मनाला भिडते, त्या अनुभवांशी जवळीक वाटते. गेल्या जवळजवळ चाळीस वर्षातली मराठी समाजाची अमेरिकेतील वाटचाल या साहित्यात प्रतिबिंबित झालेली आहे.

आपल्या अनुभवांना शब्दस्वरूप देण्यासाठी जसे येथील नियतकालिकांचे व्यासपीठ वापरले जाते, तसे साहित्यचर्चा आणि साहित्याला वाहिलेल्या 'शब्दांच्या संध्याकाळी' गावोगावचे मराठी रंगवत असतात.

गौरी देशपांडे यांच्या साहित्यावर आधारित 'आहे हे असं आहे' हा अभिनव कार्यक्रम लॉस एंजेलिस मधील 'अभिव्यक्ती' गटाने २००४ मधे केला. (नेतृत्व आणि लेखन - विद्या हर्डीकर) तर बे एरियातील 'कला' ही संस्था दर महिन्याला 'लेखक आपल्या भेटीला' हा कार्यक्रम सादर करते (नेतृत्त्व मुकुंद मराठे). काही मराठी मंडळांनी ग्रंथालये सुरू केली आहेत.

मराठी माध्यमातून शिकून १९९५ नंतर अमेरिकेत आलेल्या पिढीची नवी लाटही या मराठीच्या वेलाला खतपाणी घालू लागली आहे. बऱ्याच मराठी मंडळांवर या पिढीतले ताज्या दमाचे लोक दिसतात. महाजालावरील साहित्याचा एक नवा प्रकार त्यांनी सुरू केला आहे. 'मायबोली' या संकेतस्थळाचा विशेष उल्लेख करायला हवा <www.maayboli.com>. साहित्यनिर्मिती, साहित्य चर्चा आणि महाजालावरील पारितोषिक विजेता दिवाळी अंक यांनी हे संकेतस्थळ समृद्ध आहे. 'अंतराळ' नावाचं ई-मासिक न्यूजर्सीहून निघतं <www.antaraal.com>. टेक्ससच्या दिवाकर कारखानीस यांच्या पुढाकाराने 'सावली' हे ई-मासिक निघतं. <www.sawali.org > .

त्याशिवाय प्रत्येक मराठी मंडळाच्या संकेतस्थळावर मराठी साहित्याचे वारे वहात असतात! त्याही पुढे एक पाऊल म्हणजे लाभसेटवार प्रतिष्ठान न्यास आणि महाराष्ट्र फाउंडेशन न्यास. महाराष्ट्रातील मराठी साहित्याच्या पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नातील एक

छोटा प्रयत्न म्हणून साहित्यिकांना पुरस्कार देण्यासाठी हे न्यास निर्माण केले आहेत.

थोडक्यात महाराष्ट्रातील साहित्यिक घडामोडींची जाणीव असलेले आणि चांगल्या साहित्याची निर्मिती करू शकणारे लोक अमेरिकेत आहेत. परंतु आपापले व्याप आणि येथील वेगवान आयुष्य यांच्या सपाट्यात लेखनासाठी हवा तसा निवांतपणा मिळत नाही. त्यामुळे येथील अनुभवांचा संपूर्ण पट अजून तथाकथित 'अनिवासी' साहित्यात उलगडलेला दिसत नाही. हिमनगरासारखे येथील अनुभवांचे अस्तित्व अजून बरेचसे दडलेलेच आहे.

'शेता'पासून 'निरंतरा'पर्यंत आणि 'गुहे'पासून 'हरवलेले गवसण्या'पर्यंत काय गमावले त्याचे हिशेब आहेत. आता काय कमावले, काय जपले, याची समृद्ध तृप्ती या साहित्यात दिसायला हवी आहे. त्यापुढची अवस्था म्हणजे या सगळ्या प्रवासाकडे त्रयस्थपणे पाहातानाच्या अनुभवांचे चित्रण या साहित्यात अपेक्षित आहे. गाडीच्या मागे पहाण्याच्या आरशात (रिअर व्ह्यू मिरर) मधून जसे मागचे दिसते, तसे या साहित्यातले 'मराठीपणाचे' अनुभव काहीसे पंचवीस वर्षांपूर्वी मागे राहिलेल्या जगातले आहेत. "असं का, मुली बघायला जाण्याच्या कार्यक्रमात चहा-पोहे असायचे?" असं कदाचित आता महाराष्ट्रातील वाचकाला आश्चर्य वाटेल हे साहित्य वाचताना!

महाराष्ट्राबाहेर शिक्षण झाल्यामुळे एका अर्थाने मातृभाषा मराठी नसलेल्या, तंत्रज्ञानाचे विद्यार्थी असल्यामुळे 'मराठी'चा विषय म्हणून अभ्यास न केलेल्या लेखकांच्या साहित्यात भाषा आणि दृष्टिकोन यांचा वेगळेपणा जाणवतो. शुद्ध मराठीचा अभाव प्रसंगी खटकतोही! या मराठी साहित्याला अमेरिकेतल्या मराठी समाजात, अधिवेशनात म्हणावी तशी सन्मान्यता अजून मिळालेली नाही. एखादा अपवाद वगळता मराठी साहित्याबद्दल काही चर्चासत्र मराठी अधिवेशनात झालेले नाही. मराठी साहित्य संमेलन अजून कल्पनेतच आहे.

महाराष्ट्रातील मराठी साहित्य संमेलनात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य असते. तसे 'अनिवासी' साहित्य अजून गणना करण्याएवढेही नाही. कोणी त्या संमेलनात आपले साहित्य सादर केल्याचे ऐकिवात नाही.

अमेरिकेत, 'बेस्ट अमेरिकन शॉर्ट स्टोरीज' सारख्या उपक्रमात या साहित्याची वर्णी लागण्याचे स्वप्नही अजून खूप दूर आहे. दोन्ही देशात हे साहित्य अजून 'अनिवासी'च आहे.

एवढेच नव्हे, तर अमेरिकेतल्या पहिल्या पिढीनंतर हे साहित्य अस्तंगत होण्याची दाट शक्यता आहे. 'ई-सकाळ'सारख्या संगणकीय महाजालावरील मराठी नियतकालिकांशी आता 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' आणि 'एकता' यांसारख्या नियतकालिकांना स्पर्धा करायची आहे.

परंतु हे सर्व असले तरी मराठी साहित्यात उमटलेल्या अमेरिकन मराठी मनांच्या स्पंदनांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे यात शंकाच नाही!

मक्याचा 'म' मराठीचा झाला आणि आता तो 'म'कार महामंडल असा महाजालाचा 'म' झाला आहे आणि मराठीपणाच्या शोधात आमच्या मराठीचा वेलू देशांतरी गेला आहे!

( निवेदन : अमेरिकेतील उपक्रमांचा आणि मराठी साहित्याचा आढावा घेताना कितीही प्रयत्न केला तरी सर्व मराठी साहित्याची माहिती माझ्यापर्यंत पोहोचू शकली असेलच असे नाही. तेव्हा ज्यांची नांवे यात आली नाहीत त्यांनी न रुसता आपल्या साहित्यनिर्मितीची माहिती एकताकडे पाठवल्यास नंतर कधीतरी या लेखास पुरवणी जोडता येईल.) ◆◆◆

( टोरांटो, कॅनडा येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'एकता' त्रैमासिकाच्या सौजन्याने )
**EKATA PUBLICATION** 2315 Bridletowne Circle,Toronto,ON, M1W 2L3, CANADA
web site : **www.ekata.ca** e-mail : ekata@sympatico.ca